नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. १५ सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

परंपरेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पद्धतींचा आदर राखत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

गणेश चतुर्थीच्या मंगलमय मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांचे मुंबईतील निवासस्थान 'वर्षा' येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाची पूजा-अर्चा करून आरती केली.

श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील तसेच देशभरातील गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनात आनंद आणून सर्व विघ्ने दूर करावीत. देश, राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील अडचणी दूर होऊन सर्वांना नवचैतन्य, सामर्थ्य आणि समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि परंपरेचा उत्सव आहे. सर्व गणेशभक्तांनी हा उत्सव आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा करावा. मात्र, गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच पर्यावरणाचे भान राखण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ करणारा उत्सव असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केले. परंपरेचे जतन, पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय साधत सर्वांनी पारंपरिक



पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

## संक्षिप्त

### गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा

**महाराष्ट्राच्या लोककलेचा देश-विदेशात व्यापक जागर**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा राज्याच्या सीमांपलीकडचे देश-विदेशातील रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित 'लोककलेतील श्रीगणेश' या उपक्रमांतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांसह देशातील विविध राज्यांत, नवी दिल्लीत आणि दुबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# श्री साईबाबा समाधी मंदिरात नव्या चांदीच्या नंदीची विधिवत प्रतिष्ठापना!

**शिर्डी (समर्थ गांवकरी)**





श्री गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साईभक्तांनी श्री साईबाबांच्या चरणी ५४ किलो ०६५ ग्रॅम वजनाचा चांदीचा नंदी व बेस तसेच २२ कॅरेट सोन्याचे ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम वजनाचे शिंग व बिंदी अर्पण केली. या नव्या चांदीच्या नंदीची श्री साईबाबा समाधी मंदिरात धार्मिक विधीपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली.

चांदीच्या नंदीचे वजन २७ किलो ०२७ ग्रॅम असून त्याचे देणगीमूल्य ६० लाख २७ हजार ०२१ रुपये, तर बेसचे वजन २७ किलो ०३८ ग्रॅम असून त्याचे मूल्य ६० लाख २९ हजार ४७४ रुपये आहे. नंदी व बेसचे एकूण देणगीमूल्य १ कोटी २० लाख ५६ हजार ४९५ रुपये आहे. सोन्याचे शिंग व बिंदीचे एकूण वजन ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम असून त्यांचे देणगीमूल्य १३ लाख ८५ हजार १३२ रुपये आहे.

जुन्या नंदीचे विधिवत उत्तरपूजन करून नव्या नंदीची प्रतिष्ठापना भक्तिमय वातावरणात करण्यात आली. आग्रा येथील या साईभक्तांनी यापूर्वीही सोन्या-चांदीच्या विविध वस्तू श्रद्धेने अर्पण केल्या आहेत. त्यांच्या विनंतीनुसार

# ओतूर व परिसरात सार्वजनिक गणेश मंडळे व घरगुती गणपतींचे दिमाखात स्वागत

**ओतूर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरात गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात सार्वजनिक गणेश मंडळे तसेच घरगुती गणपतींचे मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. ओतूर तसेच रोहोकडी, आंबेगव्हाण, धोलवड, नेतवड, उदापूर, मांदारणे, बनकरफाटा, डिंगोरे, कोळवाडी आदी गावांमध्ये श्री गणेशाचे ढोल-ताशांचा गजरात मोठ्या उत्साहात स्वागत



करण्यात आले असून विविध गणेश मंडळात व घरांमध्ये फुलांची सजावट, विद्युत रोषणाई आणि आकर्षक देखावे तयार करून भक्तिमय वातावरणात गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे.

# अकोल्याचे ख्यातकीर्त विधिज्ञ के. डी. धुमाळ यांना 'आनंदोत्सव'चा राष्ट्रस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**अकोले (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर येथील गत सोळा वर्षांपासून कार्यरत असलेल्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा विशेष प्रतिष्ठेचा मानला जाणारा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च सन्मानाचा 'जीवनगौरव पुरस्कार' २०२६ अकोले येथील ॲड. के. डी. धुमाळ यांना जाहीर झाला आहे. आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी ही माहिती दिली.

अहिल्यानगर येथे साहित्य आणि संस्कृति मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या अनुदानातून व आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग महाप्रकल्पाने संयोजित माऊली सभागृहात येत्या दि. २४ व २५ ऑक्टोबर दरम्यान दोन दिवसीय जिल्हास्तरीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत ॲड. धुमाळ यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

ॲड. धुमाळ हे संस्कृती, कला व क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कार्य करणार्या अजिंक्य क्रिकेट क्लबचे अध्यक्ष म्हणून, एक ख्यातकीर्त विधिज्ञ, अकोले नगरपंचायतीचे पहिले नगराध्यक्ष, पर्यावरणप्रेमी, ज्येष्ठ सामाजिक व सांस्कृतिक धुरीण व अकोले येथील विश्वाच्या केंद्रीय व्यवस्थापनासाठी लाखो वर्षांपासून कार्यरत असलेल्या महर्षी अगस्तिमुनी आश्रमाचे सेवाभावी अध्यक्ष आहेत. तसेच प्रवरा परिक्रमा या सांस्कृतिक व जल व पर्यावरणविषयक उपक्रमाचे मार्गदर्शक, तसेच साखर कारखाना, सहकारी सोसायट्या, दूध संघ आदि महत्त्वपूर्ण संस्थांच्या व्यवस्थापनात लोकधुरीण मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. वारकरी संप्रदायांतर्गत विविध उपक्रमात त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. कोरोना काळात त्यांनी केलेले कार्य विशेष लक्षणीय ठरले आहे.

'आनंदोत्सव'च्या पुरस्काराने यापूर्वी अयोध्या येथील राममंदिर न्यासाचे महासचिव स्वामी गोविंददेवगिरिजी महाराज, पद्मश्री पोपटराव पवार, चार्टर्ड अकौंटंट सी. एल. मध्यान, कीर्तन केसरी सन्मानप्राप्त रंगनाथबुवा धर्माधिकारी, संगीततज्ज्ञ प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर आदींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. या पुरस्काराबद्दल ॲड. के. डी. धुमाळ यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शिक्षण महर्षी / थोर समाजसेवक



॥ अभिष्टचिंतन ॥

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुग व्यक्तिमत्व
सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष
मा.ॲड.मनोहरराव नानासाहेब देशमुख
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

मोबा : ९९३०६७९२२२

: शुभेच्छूक :

सत्यनिकेतन संस्था, राजूर
ॲड.एम.एन.देशमुख (अध्यक्ष)
श्री.विवेक मदन (कोषाध्यक्ष)
श्री.एम.एल.मुठे (सचिव)
सन्मा. संचालक मंडळ
श्री. टी. एन. कानवडे, श्री. व्ही. डी. पवार, श्री. पी. एस. शहा
श्री. एस. टी. येलमामे, श्री. एस. डी. पन्हाळे, श्री. पी. पी. टाकळकर
श्री. एम. एम. उमराणी, श्री. एन. डी. बेलहेकर
स्वीकृत – श्री. ए. एच. मिस्त्री, श्री. सी. जी. देशमुख
निमंत्रित – श्री. एम. बी. वाकचौरे, श्री. आर. के. काठे,
सौ. एन. आर. भारमल, सौ. एम. एस. मुठे
प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

सत्यनिकेतन संचलित,
सर्वोदय विद्या मंदिर माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, खिरवीरे
ता.अकोले, जि.अहमदनगर
प्राचार्य : श्री.मधुकर मोखरे सर
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

सत्यनिकेतन संचलित,
गुरुवर्य रा.वि.पाटणकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर
ता.अकोले, जि.अहमदनगर
प्राचार्य : श्री.बी.के.बनकर सर
उपप्राचार्य : डी. जी. बुऱ्हाडे
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

ॲड.एम.एन.देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजूर
प्राचार्य : डॉ.बी.वाय.देशमुख सर
सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वृंद

डॉ.श्री.विश्वासराव आरोटे
राज्य सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
संपादक: दैनिक समर्थ गांवकरी
संपादक: ए.व्ही.पी.न्यूज चॅनेल
संचालक : अकोले ग्रामीण पतसंस्था, अकोले

स्व.नानासाहेब विठोबा देशमुख सर्वोदय विद्या मंदिर, कातळापूर
मुख्याध्यापक: मा. श्री. गोरक्ष बाबुराव मालुंजकर
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

डॉ.राजेंद्रप्रसाद प्राथ व माध्यमिक आश्रमशाळा, शेणित
मुख्याध्यापक : श्री. बाळासाहेब चौधरी (प्राथ. विभाग)
मुख्याध्यापक : श्री. युवराज गभाले (माध्य. विभाग)
.. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद..

सत्यनिकेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पगारदार नोकरांची पतसंस्था राजूर,
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
चेअरमन : प्रा. डॉ. आर. डी. ननावरे
व्हा. चेअरमन : मा. श्री. नानासाहेब कोंडाजी शिंदे
सचिव : श्री. संतोष नंदवाणी
..सर्व सन्मा. संचालक मंडळ व सभासद वृंद..

# सहकार महर्षी भाऊसाहेब दादा नवले ग्रामीण पतसंस्थेचा रौप्य महोत्सव उत्साहात!

## पतसंस्था चळवळीमुळे सावकारशाहीला आळा; सुरक्षित कर्ज वितरण व वसुलीला प्राधान्य द्या : प्रा. बी. एम. महाले

## संस्थेचे नामकरण सहकार महर्षी भाऊसाहेब दादा नवले यांच्या नावाने केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर!










**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

राज्यातील पतसंस्था चळवळीमुळे शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला असून, एकेकाळी ग्रामीण भागात असलेली सावकारशाही मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांना कर्ज दिल्यानंतर त्याची वसुली करताना अनेक अडचणी निर्माण होत असल्याने पतसंस्थांनी कर्ज वितरण करताना सुरक्षित कर्जाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. सोनेतारण, पगारदार तसेच व्यावसायिक कर्जाच्या माध्यमातून कर्ज वितरण आणि त्याची योग्य वसुली होत असल्याने पतसंस्था चळवळ आजही राज्यात अग्रेसर आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राध्यापक तथा अर्थवेद पतसंस्थेचे चेअरमन प्रा. बी. एम. महाले यांनी केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब दादा नवले तथा अकोले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. संस्थेच्या भाऊसाहेब दादा नवले सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात ही सभा पार पडली. रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने सभेला मोठ्या संख्येने सभासदांची उपस्थिती होती. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा नामवंत उद्योजक नंदकुमार उर्फ सूर्यकांत मैड होते.

सभेच्या प्रारंभी सहकार महर्षी स्वर्गीय भाऊसाहेब दादा नवले व लक्ष्मीची विधिवत पूजा करून सभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुनील भाऊसाहेब नवले, मच्छिंद्र महादू आवारी, राजेंद्र शिवनाथ वाकचौरे, गोविंद पुंजा पुंडे, भागवत तुळशीराम पवार, विलास रंगनाथ तोरकडे, सुमन रावसाहेब नवले, सौ. चित्रा संजय रासने, सेवानिवृत्त भास्करराव नवले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, भास्करराव खांडगे, अनिल जगधने आदी संचालक उपस्थित होते.

संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेताना सभासदांनी संस्थेने केलेल्या नफा कमाईचे, कर्ज वितरणाचे तसेच वसुलीचे कौतुक केले. अध्यक्ष नंदकुमार उर्फ सूर्यकांत मैड यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने अनावश्यक खर्चाला कात्री लावत आर्थिक शिस्तीला प्राधान्य दिले. कर्मचारी वर्गाच्या अथक परिश्रमामुळे संस्थेने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली असल्याचे सभासदांनी नमूद केले. संस्थेच्या ठेवी सुमारे १८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्या असून, सुरक्षित कर्ज वितरणावर भर देण्यात येत आहे.

सुरक्षित कर्ज वितरणावर भर:

सोनेतारण कर्ज हे शाश्वतीचे कर्ज असल्याने संस्थेने या कर्जाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले आहे. त्याचबरोबर पगारदार व्यक्ती तसेच व्यावसायिकांना कर्ज देताना त्यांच्या परतफेडीची क्षमता लक्षात घेऊन कर्ज वितरण केले जात आहे. शेती क्षेत्रासाठीही संस्थेने काही प्रमाणात कर्ज वितरण केले असून, त्यातील काही कर्जांच्या वसुलीमुळे सीडी रेशोमध्ये तफावत जाणवत असली तरी योग्य नियोजनातून ही कर्जे निश्चितपणे वसूल होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

थकबाकीदार कर्जदारांवर संस्थेने नियमानुसार कारवाई केली असून, काही कर्जदारांच्या मालमत्तेवर संस्थेचा बोजा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक सुरक्षिततेला बळ मिळाले आहे. 'स्पर्धा करण्यासाठी शाखांचा विस्तार करण्यापेक्षा मुख्यालयातून सक्षम सेवा द्या, सुरक्षित कर्ज द्या आणि वसुलीला प्राधान्य द्या,' या धोरणामुळे संस्थेने वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सभासदांनी सांगितले.

'शाखा वाढविण्यापेक्षा व्यावसायिकतेला महत्त्व द्या'

सभेत मार्गदर्शन करताना प्रा. बी. एम. महाले यांनी पतसंस्था चळवळीसमोरील बदलत्या परिस्थितीवर भाष्य केले. पूर्वी शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देणे हा पतसंस्थांचा प्रमुख उद्देश होता. मात्र, कर्जवसुलीतील अडचणी वाढल्याने अनेक पतसंस्था शेती कर्जापासून इतर सुरक्षित कर्जांकडे वळल्या आहेत. पतसंस्थांनी काळाची गरज ओळखून सुरक्षितता, वसुली आणि आर्थिक शिस्त या तीन बाबींना महत्त्व द्यावे, असे त्यांनी सांगितले.

पतसंस्था चळवळीला भविष्यात मोठी संधी आहे; मात्र मल्टिस्टेट सहकारी संस्थांमध्ये काही वेळा रात्रीतून आर्थिक संकट निर्माण होते. त्यामुळे ठेवीदारांनी केवळ जादा व्याजाच्या आमिषाला बळी न पडता संस्थेची आर्थिक स्थिती तपासावी आणि 'ठेवीदारांनी चाणक्य बना', असा सल्लाही प्रा. महाले यांनी दिला. जादा व्याज मिळेल या लालसेपोटी कोणाच्याही आर्थिक जाळ्यात अडकू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

संस्थेला सहकार महर्षी भाऊसाहेब नवले यांचे नाव देण्याचा ठराव:

मागील वार्षिक सभेत संस्थेला सहकार महर्षी स्वर्गीय भाऊसाहेब दादा नवले यांचे नाव देण्याचा ठराव करण्यात आला होता. रौप्य महोत्सवी वर्षात संस्थेला हे नाव देण्यात आल्याबद्दल संचालक मंडळाच्या अभिनंदनाचा ठराव सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. संस्थेच्या स्थापनेपासून सहकार महर्षी भाऊसाहेब दादा नवले यांनी दिलेल्या योगदानाची यावेळी उपस्थितांनी आठवण करून दिली.

रौप्य महोत्सवी वर्षात संस्थेने २५ कोटी रुपयांच्या ठेवींचे उद्दिष्ट ठेवले असून, हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सभासद, ठेवीदार, कर्जदार, संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाने एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा विश्वास अध्यक्ष नंदकुमार उर्फ सूर्यकांत मैड यांनी व्यक्त केला. संस्थेने शाखा वाढविण्यापेक्षा सध्याच्या ठिकाणाहून सर्व सभासदांना सक्षम आणि विश्वासार्ह सेवा देण्यावर भर देण्याचे धोरण कायम ठेवले आहे.

कर्मचारी वर्गाच्या कामाचे कौतुक:

संस्थेच्या वर्षभरातील प्रगतीमध्ये कर्मचारी वर्गाचा मोठा वाटा असल्याचे सभेत अधोरेखित करण्यात आले. कर्मचारी वर्गाने चांगले काम केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच कर्मचाऱ्यांच्या कामाचा योग्य सन्मान व्हावा आणि दिवाळी बोनस वाढविण्यात यावा, अशी मागणी सभासदांनी केली. सभासदांच्या या मागण्यांना संचालक मंडळाने सकारात्मक प्रतिसाद दिला.

सभेत सभासदांसाठी समोपचार कर्जफेड योजना राबविण्याचा ठरावही सर्वानुमते मंजूर करण्यात आला. थकीत कर्जदारांना कायदेशीर प्रक्रियेसोबतच समोपचारातून कर्जफेडीची संधी उपलब्ध करून देणे हा संस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

'कासवाप्रमाणे सातत्याने वाटचाल करा' – डॉ. विश्वासराव आरोटे

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना पतसंस्थांनी इतर संस्थांशी अनावश्यक स्पर्धा करण्यापेक्षा नियमांच्या चौकटीत राहून काम करावे, असा सल्ला दिला. 'कासवाप्रमाणे सातत्याने चालावे; सशाप्रमाणे वेगाने धावताना वाट चुकू नये,' असे सांगत संस्थेच्या हितासाठी सुरक्षित आणि नियमबद्ध व्यवहाराला प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.

सोनेतारण कर्जाचे मोठ्या प्रमाणात वितरण तसेच व्यावसायिक कर्ज देऊन त्याची योग्य वसुली होत असल्यामुळे संस्थेने आर्थिक विश्वासार्हता निर्माण केली आहे. ठेवीदारांचा विश्वास संपादन केल्यामुळे गरजेच्या वेळी ठेवीदारांना पैसे उपलब्ध करून देण्याची सक्षम स्थिती संस्थेने निर्माण केली असल्याचे डॉ. आरोटे यांनी सांगितले. संस्थेच्या वर्षभराच्या कामकाजात कर्मचारी वर्गाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

'कर्ज घेणे म्हणजे डोंगर उतरायचा, कर्ज फेडणे म्हणजे पुन्हा डोंगर चढायचा प्रवास'

सभेत कर्ज आणि उद्योग–व्यवसायाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. कर्ज घेणे म्हणजे डोंगरावरून खाली येणे आणि कर्जाची परतफेड करणे म्हणजे पुन्हा डोंगर चढण्यासारखा प्रवास आहे. हा प्रवास जो व्यावसायिक बाजारपेठेत यशस्वीपणे पूर्ण करतो, तोच यशस्वी उद्योजक आणि चांगली पत निर्माण करू शकतो, असा संदेश यावेळी देण्यात आला.

सभेत सागर सतीश तिकांडे, हरिभाऊ अस्वले, नामवंत उद्योजक गोपीनाथ नाईकवाडी, राजेंद्र नाईकवाडी, एलआयसी सल्लागार रामनाथ मंडलिक, नामवंत उद्योजक सोमनाथ बाळसराफ, प्रगतिशील शेतकरी सचिन रामहरी शेटे, नवनाथ पुंडे, सीताराम शेटे, अण्णासाहेब नवले, सोपान नवले, नामवंत उद्योजक चंदर शिंदे, सत्यवान ढगे, जितेंद्र मैड, सौ. मालती शिंदे, दैनंदिन ठेव प्रतिनिधी जयराम जाधव, सौ. सुषमा वाकचौरे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचा वार्षिक अहवाल वाचन संचालक गोविंद पुंडे यांनी केले, तर इतिवृत्त वाचन संस्थेचे जनरल मॅनेजर संतोष अभंग यांनी केले. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले. शेवटी संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा नामवंत उद्योजक मच्छिंद्रशेठ आवारी यांनी आभार मानले. रौप्य महोत्सवी वर्षात संस्थेने २५ कोटींच्या ठेवींचे उद्दिष्ट गाठणार असुन सभासद, ठेवीदार आणि कर्जदारांचा विश्वास आणखी दृढ करावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# यशोमंदिर सहकारी पतपेढीच्या ४८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग!

## ६२० कोटींची उलाढाल; ८ टक्के लाभांश, पुढील वर्षी १० टक्के लाभांशाचे उद्दिष्ट – सर्व विषय एकमताने मंजूर!







**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

यशोमंदिर सहकारी पतपेढीच्या ४८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन घाटकोपर येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. सभेच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक संचालक एम. एस. दादा गायकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. श्री. भानुदास आरोटे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तर संस्थेचे उपाध्यक्ष अमोल उगले यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. बी. आर. आरोटे, बी. जी. गायकर, अशोक वाळुंज यांच्यासह संचालक व संचालिकांनी पूजन केल्यानंतर सभेच्या कामकाजाला प्रारंभ झाला.

कामकाजाच्या सुरुवातीस अहवाल सालात निधन झालेल्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती तसेच सैन्यदल व शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा अहवाल सभासदांसमोर सादर करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष भानुदास आरोटे यांनी सभासदांना दिलेला शब्द वार्षिक अहवालातून प्रत्यक्षात उतरल्याचे दिसून येत असल्याचे सभासदांनी नमूद केले. संस्थेने वर्षभरात तब्बल ६२० कोटी रुपयांची उलाढाल केली असून, संस्थेच्या प्रगतीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त केले.

संस्थेच्या विविध शाखांमध्ये कर्मचारी व सभासदांशी योग्य पद्धतीने वर्तन होत नसल्याच्या बाबींची संचालक मंडळाने गांभीर्याने दखल घेतली. अशा काही शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुनर्वसन करून संस्थेच्या कामकाजात आवश्यक सुधारणा करण्यात आल्याबद्दल सभासदांनी संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

सभेदरम्यान ज्येष्ठ सभासद उमाजी काळे, खंडू गाजरे, नामवंत उद्योजक विलास शेठ फापाळे, नवी मुंबईतील समाजसेवक भावी नगरसेवक कैलासराव गायकर, शारदाताई गायकर, सुनील शिंगोटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा मुख्याध्यापक राजेंद्र गंवादे . जुन्नर तालुक्यातील कळवाडी ग्रामपंचायत सरपंच तुषार वामन, बबन आरोटे, चंद्रकांत हेळवंडे, माजी कर्मचारी प्रतिनिधी सिताराम आरोटे. ब्राह्मणवाडा पतपेढीचे माजी अध्यक्ष विलासराव आरोटे, , नामांकित विधिज्ञ अशोक गायकर, अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन आरोटे, ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तथा संस्थेचे संचालक धोंडीभाऊ चव्हाण, माजी संचालक शिवाजी संतु आरोटे, भरत फापाळे, सेवानिवृत्त कर्मचारी शंकर आरोटे, गणेश गायकर सर, किरण बोडके, राजेंद्र बोडके, माजी संचालक शरद बोडके, कोपरखैरणे येथील शिवछत्रपती पतपेढी सोसायटीचे अध्यक्ष मारुतीराव कोंडे यांच्यासह अनेक सभासदांनी विविध प्रश्न उपस्थित केले.

सभासदांच्या प्रश्नांना संस्थेचे मुख्य व्यवस्थापक बाळशिराम गंवादे आणि अध्यक्ष भानुदास आरोटे यांनी समर्पक उत्तरे दिली. आवश्यक कागदपत्रांची मागणी करणाऱ्या सभासदांना संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अध्यक्ष आरोटे यांनी दिले. सभासदांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देणे हे संचालक मंडळाचे कर्तव्य असून, सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाने त्यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थेने यावर्षी सभासदांना ८ टक्के लाभांश देण्याचे जाहीर केले असून, पुढील वर्षी १० टक्के लाभांश देण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येक शाखेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असून, शाखांच्या वर्धापन दिनाचे नियोजन पालक समितीचे अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष सर्वांना विश्वासात घेऊन करतील, असेही आश्वासन देण्यात आले.

सहकार खात्याने एनपीए धोरणाबाबत जारी केलेल्या परिपत्रकाचे संस्थेने तंतोतंत पालन केले असून, कर्जवाटप व कर्जवसुलीबाबत आवश्यक ती खबरदारी घेतली जात असल्याचे संचालक मंडळाने स्पष्ट केले. विद्यमान संचालक मंडळ निवडून आल्यानंतर मंडळाने केलेल्या कर्जवाटपातील एक रुपयाही एनपीएमध्ये गेलेला नसल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

वेळप्रसंगी आम्ही वाईट झालो तरी चालेल; मात्र ठेवीदारांचा पैसा आणि सभासदांचा विश्वास हाच आमच्या कामाचा अजेंडा आहे, अशी भूमिका अध्यक्ष भानुदास आरोटे यांनी व्यक्त केली. संचालक मंडळाने वर्षभरात कोणताही प्रवास भत्ता घेतलेला नसून संस्थेच्या कामासाठी पदरमोड करून योगदान दिल्याचेही यावेळी सांगण्यात आले. निवडणुकीच्या वेळी सभासदांना दिलेला शब्द पाळण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोतुळ व घारगाव येथे नव्या शाखा सुरू करण्यात आल्या असून, या शाखांच्या कामकाजाबाबतच्या ताळेबंद व जमाखर्चावर सभासदांनी कोणताही आक्षेप नोंदविला नाही. उलट संस्थेच्या आर्थिक शिस्तीचे, पारदर्शक कामकाजाचे आणि संचालक मंडळाच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत सभासदांनी अभिनंदनाचा ठराव केला.

या सभेला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी त्यांनी सहकार क्षेत्राच्या वाटचालीवर भाष्य करताना, पतसंस्था या केवळ आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था नसून सर्वसामान्य सभासद, शेतकरी, छोटे व्यावसायिक व कष्टकरी वर्गाला आर्थिक आधार देणाऱ्या महत्त्वाच्या संस्था असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेची आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदांचा विश्वास या तीन बाबी कोणत्याही सहकारी संस्थेच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

सभासदांचा विश्वास हीच संस्थेची खरी संपत्ती आहे. ठेवीदारांच्या पैशाची सुरक्षितता, योग्य पद्धतीने कर्जवाटप आणि वेळेत कर्जवसुली यामध्ये संतुलन राखले तर सहकारी पतसंस्था अधिक सक्षम होऊ शकते. संस्थेने आर्थिक शिस्त कायम ठेवत सभासदांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. यशोमंदिर पतपेढीने आजवर केलेली वाटचाल ही सभासद, कर्मचारी आणि संचालक मंडळाच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे, असे डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले.

संस्थेचे संचालक मंडळ व अधिकारी वर्ग : यशोमंदिर सहकारी पतपेढी मर्यादितच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीतील संचालक मंडळामध्ये संस्थापक संचालक श्री. मधुकर दादा गायकर, अध्यक्ष श्री. भानुदास आरोटे, उपाध्यक्ष श्री. अमोल उगले यांच्यासह श्री. भाऊ आरोटे, श्री. बाबूराव गायकर, श्री. अशोक वाळुंज, श्री. अंकुश बोडके, श्री. दिनेशचंद्र हलवळे, श्री. विजयकुमार मवाळ, श्री. किरण गवांदे, श्री. मंगेश हांडे, श्री. संतोष शिंगोटे, श्री. मारुती जाधव, सौ. रसिका गायकर, सौ. उल्का गवांदे, श्री. दिनेश फापाळे व श्री. बजरंग सो. नागरे यांचा समावेश आहे. तसेच संस्थेच्या अधिकारी वर्गामध्ये श्री. भाऊसाहेब गवांदे, श्री. बाळासाहेब रंधे, श्री. राजेंद्र गायकर, श्री. किसन पोखरकर व श्री. जयराम वाकळे यांच्यासह अधिकारी व मुख्याधिकारी कार्यरत असून, श्री. चिमाजी फापाळे व श्री. संतोष गायकर हे कर्मचारी प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांच्या समन्वयातून संस्थेचा कारभार अधिक गतिमान, पारदर्शक व सभासदाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. संस्थेच्या अध्यक्ष व संचालक मंडळाने यावर्षी सभासदांसाठी मिठाई व भोजनाची व्यवस्था करून सभासदांप्रती असलेली आपुलकी व्यक्त केली. सभेतील सर्व विषय सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने मंजूर केले.

यशोमंदिर सहकारी पतपेढीने राज्यातील अन्य पतसंस्थांपेक्षा आपला वेगळा आणि आदर्श कार्यपद्धतीचा ठसा निर्माण केला असून, सभासदांचा विश्वास कायम ठेवत संस्थेची वाटचाल अधिक सक्षम करण्याचा निर्धार संचालक मंडळाने व्यक्त केला.

## अगस्ति सहकारी साखर कारखाना लि. अगस्तिनगर
## ता. अकोले, जि.अहिल्यानगर

तार – अगस्ति साखर, अकोले

फोन नं.(०२४२४) २२२७७५, २९७१२६

E-mail - agastisakhar@rediffmail.com

### –हंगामी कंत्राटी कामाची टेंडर नोटीस–

आमचे ३५०० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेल्या साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६–२७ साठी खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे हंगामी कामे ठेका पध्दतीने (रेग्युलेशन ॲण्ड ॲम्ब्युलेशन ॲक्टनुसार) इच्छुक व अनुभवी ठेकेदारांनी देण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामांचे कोरे निविदा फॉर्म कारखान्याच्या प्रशासन कार्यालयात दि. १५/०९/२०२६ ते २०/०९/२०२६ या कालावधी टेंडर फॉर्म फी भरुन कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | टेंडरसाठी द्यावयाचा दर | फॉर्म फि | अनामत रक्कम रु |
|---|---|---|---|---|
| १ | शुगर गोडाऊनकडील हमाली कामे व शुगर हाऊसमधील पन्हाळीची कामे | प्रति बॅग (५० किलो पी.पी.बॅग /ज्युट बॅग ) | ३०००/– | ५००००/– |
| २ | साखर पोती वाहतुकीचे काम | वरीलप्रमाणे | २०००/– | १५०००/– |
| ३ | केमिकल वाहतुक व चुना, निवळी तयार करणेचे काम | प्रति दिन २४ तासा करीता | २०००/– | १००००/– |
| ४ | ज्युस हिटर व इव्हॅपोरेटर बॉडी टयुब ब्रशींग करणेचे काम (चालु हंगाम व ऑफ सिझन करीता) | प्रति चौरस मिटर | २०००/– | १५०००/– |
| ५ | प्रेसमड (मळी) वाहतुकीचे काम | प्रति दिन २४ तासा करीता | २०००/– | १५०००/– |
| ६ | बॉयलर राख वाहतुक | प्रति दिन २४ तासा करीता | २०००/– | १५०००/– |
| ७ | केनयार्ड मधील गव्हाण कामे | प्रति मे. टन | १०००/– | १००००/– |
| ८ | बगॅस बेलींग व अनुषंगीक कामे | प्रति मे. टन | ३०००/– | ५००००/– |
| ९ | गाडी तळावरील टिपरी गोळा करणे | प्रति मे. टन | ५००/– | २०००/– |
| १० | टायर पंक्चर काढणे अ) सिझनमधील टायर पंक्चर काढणे | टेंडर फॉर्मप्रमाणे | १०००/– | ५०००/– |
| ११ | बॉयलर वेट स्क्रबर सिस्टीम मधील राख वाहतूक | प्रति मे. टन | २०००/– | २५०००/– |
| १२ | सिझन मधील प्रेसमड पासुन बायोकंपोष्ट खत तयार करणेचे काम | प्रति मे. टन | ३०००/– | ५००००/– |
| १३ | कार्यक्षेत्र व कार्यक्षेत्राबाहेरील सिझन मध्ये ऊस वाहतुक करणाऱ्या टायर गाडयांचे टायर पंक्चर, ॲक्सल, धुरी, डिक्स बेअरींग इ. चे मेंन्टेनंन्सची कामे करणेसाठी दोन भाडोत्री पिकअप वाहन पुरविणे. | १) टायरबैलगाडी ३७५<br>२) हेवी ट्रॅक्टर गाडया २३७<br>३) जुगाड ट्रॅक्टर ८१ | २०००/– | २५०००/– |

वरील टेंडर करीता अनुभव प्रमाणपत्र, लेबर लायसन्स, पी.एफ.लायसन्स, जी.एस.टी. रजिस्ट्रेशनसह टेंडर निविदा फॉर्म बंद पाकिटात दि.२०/०९/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत साप्ताहिक गुरुवार सुटटीचा दिवस सोडून कारखान्याचे प्रशासन विभागात स्विकारले जातील. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरावी. कोणतेही कारण न दाखविता निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार कारखाना व्यवस्थापनाने राखून ठेवले आहेत.

(सुधिर कापडणीस) कार्यकारी संचालक

(श्रीमती सुनिताताई भांगरे) व्हा. चेअरमन

(सिताराम पाटील गायकर) चेअरमन

# वकिलीपासून समाजसेवेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास!

## अ‍ॅड्. म. ना. देशमुख यांच्या कार्यातून माणुसकी, दानशूरता आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श!

**वकिली क्षेत्रात तब्बल ५७ वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द, अध्यात्म आणि योगसाधनेची आवड, शिक्षणासाठी मदतीचा हात, गरजू व निराधारांसाठी वृद्धाश्रमाची उभारणी, वारकरी व भाविकांसाठी धर्मशाळा, मंदिरांच्या विकासासाठी योगदान तसेच क्रीडा व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सातत्याने सुरू असलेले कार्य, अशा विविध क्षेत्रांतील योगदानामुळे अ‍ॅड्. म. ना. देशमुख यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी ठरले आहे.**





(स. गांवकरी)

केळुंगण हे अ‍ॅड. देशमुख यांचे मूळ गाव. त्यांच्या वडिलांनी नोकरीनिमित्त मुंबई गाठून ब्रिटिश प्रशासनातील रेल्वे खात्यात सेवा बजावली. मर्यादित शिक्षण असूनही त्यांनी शिस्त, सचोटी, नियमितपणा आणि काटकसरीचे संस्कार आत्मसात केले. मुलाने उच्च शिक्षण घ्यावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. या संस्कारांच्या पायावर अ‍ॅड. देशमुख यांची जडणघडण झाली.

कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी स्वतंत्रपणे वकिली व्यवसायाला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी कायद्याचा सखोल अभ्यास, जिद्द, प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर वकिली क्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करताना त्यांचा अभ्यासपूर्ण आणि प्रभावी युक्तिवाद विशेष चर्चेचा विषय ठरला. पक्षकाराशी आदराने वागणे, त्याला योग्य कायदेशीर मार्गदर्शन करणे आणि प्रकरणाचा सखोल अभ्यास करणे ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये मानली जातात.

गेल्या सुमारे ५७ वर्षांपासून ते वकिली व्यवसायात कार्यरत आहेत. गरीब, श्रीमंत, उद्योजक, व्यावसायिक, दुकानदार, डॉक्टर, बिल्डर, नोकरदार अशा समाजातील विविध स्तरांतील नागरिक त्यांच्याकडे कायदेशीर सल्ल्यासाठी येतात. अनेक गरजू व्यक्तींना त्यांनी निःस्वार्थपणे कायदेशीर मार्गदर्शन केले आहे.

**शिस्तबद्ध जीवनशैली आणि अध्यात्म :** अ‍ॅड. देशमुख यांची जीवनशैली अत्यंत शिस्तबद्ध आहे. पहाटे चार ते साडेचार वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दिवसाची सुरुवात होते. योग, प्राणायाम, देवपूजा आणि त्यानंतर नियमित कामकाज असा त्यांचा दिनक्रम आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते योग आणि प्राणायामाचा नियमित सराव करतात.

प.पू. घागरे गुरुजी आणि प.पू. रत्नाकर महाराज यांचे त्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. दत्तगुरूचा जप आणि नियमित साधना हा त्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. स्वतः योगसाधना करण्याबरोबरच कुटुंबीय, मित्र आणि परिचितांनाही योग व प्राणायामाचे महत्त्व ते पटवून देतात.

**धार्मिक पर्यटन आणि पायी तीर्थयात्रा :** धार्मिक संस्कारांमुळे अ‍ॅड. देशमुख यांनी कुटुंबीय आणि नातेवाईकांसह अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या आहेत. अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंगे, पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूरची महालक्ष्मी, गाणगापूर यांसह देशातील विविध तीर्थक्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या.

मुंबईहून शिर्डीपर्यंत पायी जाण्याचे पाच-सहा उपक्रम त्यांनी सहकाऱ्यांसह केले. तसेच त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरीची सुमारे १६ किलोमीटरची परिक्रमा श्रावणी सोमवारी अनेक वेळा अनवाणी पूर्ण केली आहे.

**वारकरी आणि भाविकांसाठी धर्मशाळा :** धार्मिक आणि सामाजिक कार्याचा भाग म्हणून त्र्यंबकेश्वर येथे वारकरी आणि भाविकांच्या निवासासाठी दोन मजली धर्मशाळा उभारण्यात आली आहे. पुणे, अहिल्यानगर तसेच अन्य जिल्ह्यांतून दर्शनासाठी वारीसाठी येणाऱ्या हजारो भाविकांना गेल्या अनेक वर्षांपासून या धर्मशाळेचा लाभ होत आहे.

पंढरपूर येथेही त्यांनी धर्मशाळा उभारली असून वारकरी आणि भाविकांसाठी निवासाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**केळुंगण येथे वृद्धाश्रम :** निराधार आणि गरजू वृद्धांना आधार मिळावा, या उद्देशाने केळुंगण येथे दोन मजली वृद्धाश्रम उभारण्यात आला आहे. सुमारे १५० ते २०० वृद्धांची क्षमता असलेल्या या वास्तूमध्ये अनेक वर्षांपासून वृद्ध महिला-पुरुष वास्तव्यास आहेत.

वृद्धांना विनामूल्य चहा, नाश्ता, दोन वेळचे भोजन, आरोग्य तपासणी आणि आवश्यक औषधांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते. व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागासह अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील गरजू वृद्धांनाही या उपक्रमाचा लाभ मिळत आहे.

**शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान :** गरीब आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेला अ‍ॅड. देशमुख यांनी सन १९९७-९८ पासून विविध स्वरूपात सहकार्य केले आहे. महाविद्यालयाच्या इमारत उभारणीसाठी त्यांनी आर्थिक मदत केली. त्यांच्या योगदानातून दोन मजली इमारत उभारण्यात आली.

सन २००२ मध्ये संस्थेच्या आग्रहास्तव त्यांनी अध्यक्षपद स्वीकारले. त्यानंतर संस्थेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली. कातळापूर येथील विद्यालयाच्या जुन्या इमारतीची दुरुस्ती तसेच मुख्याध्यापकांचे कार्यालय, ग्रंथालय आणि प्रयोगशाळेसाठी नवीन इमारत उभारण्यातही त्यांनी योगदान दिले.

**मंदिरांच्या विकासासाठी मदत :** अकोले तालुक्यातील विविध गावांतील धार्मिक स्थळांसाठीही त्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. केळुंगण येथे श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांच्या भव्य मूर्ती देण्यात आल्या. माळेगाव येथील देवी मंदिराचा जीर्णोद्धार करून नवीन मंदिर उभारण्यात योगदान दिले.

गोंदुशी, कातळापूर, म्हाळुंगी, टाकेद, खडकी, लतिफवाडी आदी गावांतील मंदिरांसाठी राजस्थानातील कारागिरांकडून तयार करून घेतलेल्या देवदेवतांच्या सुबक मूर्ती देण्यात आल्या आहेत. अनेक गावांतील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठीही त्यांनी मदत केली आहे.

**मुलुंड जिमखान्याच्या उभारणीत सहभाग :** मुलुंड आणि परिसरातील नागरिकांना क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या मुलुंड जिमखान्याच्या कार्यात अ‍ॅड. देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. जिमखान्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून घेणे, देणग्या उभारणे आणि संस्था उभारणीच्या प्रक्रियेत त्यांनी पुढाकार घेतला.

सर्वांच्या आग्रहामुळे त्यांनी जिमखान्याचे अध्यक्षपद स्वीकारले. आज येथे विविध इनडोअर आणि आउटडोअर खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. शेकडो खेळाडू या सुविधांचा लाभ घेत असून काही खेळांचे आधुनिक प्रशिक्षण तसेच प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमही येथे राबविले जातात.

**अंबिका योग कुटीरचे अध्यक्ष म्हणून कार्य :** ठाणे येथील अंबिका योग कुटीर संस्थेशी अ‍ॅड. देशमुख यांचे अनेक दशकांचे संबंध आहेत. कै. निकम गुरुजींनी स्थापन केलेल्या या संस्थेच्या कार्यात ते सुरुवातीपासून सहभागी झाले. गुरुजींच्या विश्वासामुळे त्यांच्या हयातीतच अ‍ॅड. देशमुख यांच्याकडे संस्थेचे अध्यक्षपद सोपविण्यात आले.

गेल्या ३० ते ४० वर्षांत या संस्थेच्या माध्यमातून हजारो योगसाधकांनी योगाचे प्रशिक्षण घेतले आहे. मुंबईतील विविध उपनगरांसह देशातील अन्य भागांत आणि परदेशातही योगाचा प्रसार झाला आहे.

**कुटुंबीय आणि कर्मचाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध :** अ‍ॅड. देशमुख आपल्या कुटुंबीयांशी आणि नातेवाईकांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध जपतात. सहाही बहिणींच्या सुख-दुःखाची ते नियमितपणे विचारपूस करतात. अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी ते तत्पर असतात.

त्यांच्या घरातील आणि कार्यालयातील कर्मचारीही अनेक वर्षांपासून त्यांच्यासोबत कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांशी कुटुंबातील सदस्यांप्रमाणे आपुलकीने वागणे, त्यांच्या गरजांची काळजी घेणे आणि सणासुदीला त्यांना मदत करणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये आहेत.

**साधेपणा आणि 'मी'पणापासून दूर असलेली वृत्ती :** वकिली क्षेत्रात मोठे यश मिळवूनही अ‍ॅड. देशमुख यांच्या स्वभावात अहंकार किंवा मोठेपणाचा आव नाही. 'माझे'पेक्षा 'आपले' या भावनेला ते अधिक महत्त्व देतात. त्यामुळे त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना आपलेपणाची जाणीव होते.

नातेवाईकांना घर उभारणीपासून विविध कौटुंबिक अडचणींपर्यंत मदत करणे, गरजूंना कायदेशीर सल्ला देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे आणि सामाजिक संस्थांना आर्थिक पाठबळ देणे, या माध्यमातून त्यांनी समाजाशी असलेली बांधिलकी जपली आहे.

**क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी :** शालेय आणि महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना व्यायाम आणि वेटलिफ्टिंगची आवड होती. महाविद्यालयीन काळात त्यांनी विद्यापीठ स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. क्रीडा, शिक्षण, वकिली, अध्यात्म आणि समाजसेवा या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी सातत्याने सहभाग नोंदविला आहे.

**सेवाभावातून उभे राहिलेले व्यक्तिमत्त्व :** अ‍ॅड. म. ना. देशमुख यांचा जीवनप्रवास हा केवळ एका यशस्वी वकिलाचा प्रवास नाही. वकिली व्यवसायासोबतच शिक्षण, आरोग्य, योग, क्रीडा, अध्यात्म, धार्मिक कार्य आणि समाजसेवा या क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान त्यांच्या सामाजिक बांधिलकीची साक्ष देते.

धर्मशाळा, वृद्धाश्रम, शैक्षणिक संस्था, योगसंस्था, क्रीडा संस्था आणि मंदिरांच्या माध्यमातून त्यांनी समाजासाठी उभ्या केलेल्या विविध उपक्रमांमुळे त्यांच्या कार्याचा व्यापक प्रभाव दिसून येतो. कर्तृत्वासोबत माणुसकी, संपत्तीसोबत सामाजिक बांधिलकी आणि यशासोबत सेवाभाव जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून अ‍ॅड. म. ना. देशमुख यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी ठरतो.

**संकलन : डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून**
**सहकार्य : प्रा सचिन लगड सर राजुर**

# घरकुलासाठी सरसकट ४ लाख, सोलरसाठी १ लाख द्या

## माजी भाजप तालुकाध्यक्ष कैलास रहाणे यांची शासनाकडे मागणी

## आमदार विवेक भैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

**कोपरगांव (समर्थ गांवकरी)**

दिवसेंदिवस वाढणारी महागाई, बांधकाम साहित्याचे वाढलेले दर आणि मजुरीचा वाढता खर्च पाहता सध्याच्या घरकुल अनुदानातून गरीब व गरजू कुटुंबांना घर पूर्ण करणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना सरसकट ४ लाख रुपयांचे घरकुल अनुदान द्यावे, तसेच सोलर योजनेसाठी मिळणारी मदत वाढवून १ लाख रुपये करावी, अशी मागणी माजी भाजप तालुकाध्यक्ष कैलास रहाणे यांनी शासनाकडे केली आहे.

सध्या घरकुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, तर बांधकामाच्या मजुरीपोटी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत सुमारे २८ हजार रुपये मिळतात. तसेच सोलर योजनेसाठी सुमारे ५० हजार रुपयांची मदत उपलब्ध आहे. मात्र, सध्याच्या महागाईच्या काळात ही मदत अपुरी पडत असल्याने अनेक लाभार्थ्यांसमोर घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

'मंजुरी मिळते; मात्र घर पूर्ण करण्यासाठी पैसा कुठून आणायचा?'

घरकुल मंजूर झाल्यानंतर सिमेंट, लोखंड, वाळू, विटा, खडी तसेच मजुरीच्या वाढलेल्या दरामुळे प्रत्यक्ष बांधकामाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे शासनाने केवळ घरकुल मंजूर करण्याऐवजी घर पूर्ण होईल एवढे पुरेसे अनुदान उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, असे कैलास रहाणे यांनी म्हटले आहे.

शासनाने सध्याचे घरकुल अनुदान वाढवून सरसकट ४ लाख रुपये करावे. त्यामुळे गरीब कुटुंबांना कर्जबाजारी न होता सुरक्षित व मजबूत घर उभारणे शक्य होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सोलरसाठी १ लाखांची मदत द्या

ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांसाठी सोलर योजनेत सध्या मिळणारी सुमारे ५० हजार रुपयांची मदत वाढवून १ लाख रुपये करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

सोलर यंत्रणा उभारण्यासाठी सुरुवातीचा खर्च करणे अनेक गरीब कुटुंबांना शक्य होत नाही. त्यामुळे शासनाने लाभार्थ्यांना पुरेशी आर्थिक मदत उपलब्ध करून देऊन सोलर योजनेचा लाभ अधिकाधिक गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचवावा, अशी मागणी रहाणे यांनी केली आहे.

आमदार विवेक भैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्र्यांची भेट

घरकुल व सोलर अनुदान वाढविण्याच्या या मागणीसाठी आमदार विवेक भैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच शिष्टमंडळ घेऊन राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे कैलास रहाणे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील गरीब व गरजू नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळूनही आर्थिक अडचणींमुळे घर पूर्ण करता येत नसेल, तर त्या योजनेचा मूळ उद्देशच अपूर्ण राहतो. त्यामुळे शासनाने वाढती महागाई व बांधकाम खर्च लक्षात घेऊन घरकुलासाठी ४ लाख रुपये आणि सोलरसाठी १ लाख रुपये मदत करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी कैलास रहाणे यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी घेतली भांबरकर परिवाराची सांत्वनपर भेट



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

कल्याण रोड, गणेशनगर येथील विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर व एस.टी.बस चालक सतीश भांबरकर यांच्या ज्येष्ठ भगिनी कु. प्रमिला भांबरकर यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.त्यांच्या कुटुंबीयांची विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकरजी गायकर यांनी सांत्वनपर भेट घेतली. स्व.कु.प्रमिला भांबरकर यांनी डॉ.देशपांडे हॉस्पिटल, व डॉ.तांबोळी हॉस्पिटलमध्ये २५ वर्षे परिचारिका नर्स म्हणून सेवा केली.आरोग्य सेवेच्या कार्यात त्यांचे मोठे योगदान आहे. यावेळी शंकर गायकर म्हणाले, सेवा परमो धर्म, मनुष्य सेवा करणे हाच खरा धर्म आहे.या प्रमाणे सेवाभाव वृत्तीने आरोग्य सेवेचे केलेले कार्य महान आहे. स्वर्गीय प्रमिला भांबरकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे.भांबरकर परिवाराला या दुःखातून सावरण्याची ईश्वर शक्ती देवो.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, भारतीय मजदूर संघाचे प्रदीप भाटे,मयूर राजपुरोहित, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,निसर्गसृष्टी गौशाळेचे गौतम कराळे,सुरेंद्र सोनवणे,भाजपचे मुकुल गंधे,भारतीय किसान संघाचे जिल्हाप्रमुख निलेश चिपाडे, आदी उपस्थित होते.

### मुख्याध्यापकांनी सर्व घटकांना सोबत घेऊन शाळेचा विकास साधावा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने नगर–कल्याण रोड येथील अमरज्योत मंगल कार्यालयात एकदिवसीय शैक्षणिक चर्चासत्र व जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमास अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघाचे आमदार संग्राम जगताप, नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. सत्यजित तांबे, महापौर सौ. ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, भाजपाचे सरचिटणीस तथा नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक बाळासाहेब पवार, शिक्षणाधिकारी बाळासाहेब घुगे, वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के, ऑडिटर सतीश लहाने, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, सरचिटणीस मिथुन डोंगरे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ज्ञान कलश मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शाळा चालविताना मुख्याध्यापकांना अनेक प्रकारची कसरत करावी लागते. प्रशासनातील विविध प्रश्न, शिक्षकांच्या समस्या, विद्यार्थी व पालकांच्या अपेक्षा तसेच संस्थाचालकांशी समन्वय साधत मुख्याध्यापकांना काम करावे लागते. त्यामुळे सर्व घटकांना विश्वासात घेऊन सकारात्मक वातावरणात शाळेचा विकास साधणे गरजेचे आहे.

### वळती–गांजवेवाडी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न



**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील वळती परिसरात गांजवेवाडी मधील बोऱ्हाडेमळा,जाधवमळा भोकरवस्तीत चोरट्यांनी शुक्रवार दि.११ रोजी रात्री अनेक ठिकाणी चोरी तसेच चोरीचे प्रयत्न केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.मंचर पोलीस ठाण्यात रविवार दि.१३ रोजी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांजवेवाडी येथे बंद घर फोडून सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम चोरीस गेली असून, त्यानंतर बोऱ्हाडेमळा परिसरातही घरातील कपाट उघडून नवीन कपडे चोरून नेण्यात आले.पुढे भोकरवस्ती येथे घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र घरातील व्यक्तींना जाग आल्याने चोरट्यांनी तेथून पळ काढला. मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी प्रथम गांजवेवाडी येथील धनंजय तुकाराम ठाकूर यांच्या बंद घराला लक्ष्य केले.घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश केला.घरातील सुमारे २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच १५ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याचे समोर आले आहे.त्यानंतर चोरट्यांनी बोऱ्हाडेमळा परिसराकडे मोर्चा वळविला.भगवान बोऱ्हाडे यांच्या घरात प्रवेश करून कपाट उघडण्यात आले.कपाटातील नवीन कपडे चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती मिळाली आहे. त्यानंतर चोरटे गांजवेवाडी, बोऱ्हाडे मळा व जाधव मळा परिसरातून भोकरवस्तीच्या दिशेने गेल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे.भोकरवस्ती येथे रामदास भोर यांच्या घरात चोरी करण्याच्या उद्देशाने घर उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## परमपूज्य श्री श्री नारायण महाराज अण्णा महाराज यांचा द्वितीय समाराधना दिन पुण्यस्मरण सोहळा

**संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)**



परमपूज्य श्री .श्री . श्री.विश्वचैतन्य सद्गुरु नारायण महाराज ,अण्णा यांचे आशीर्वादाने व परमपूज्य टेंबे स्वामी यांचे मार्गदर्शनाने श्री दत्त देवस्थान सेवाभावी ट्रस्ट निर्मल नगर, संगमनेर महाविद्यालयासमोर गुंजाळवाडी, संगमनेर येथे गुरुवार दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी परमपूज्य श्री क्षेत्र नारायणपूर देवस्थानचे श्री .अण्णा महाराज यांचे द्वितीय समाराधना (पुण्यस्मरण सोहळा) सायंकाळी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेला आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी संगमनेर येथील आश्रमात जमावे असे नम्र आवाहन दत्त सेवेकरी शिष्य व ग्रामस्थ निर्मळ नगर गुंजाळवाडी यांनी केले आहे .त्यानिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन केले आहे .संध्याकाळी पाच ते सहा रुद्राभिषेक सहा ते साडेसहा वाजता भजन व साडेसहा ते साडेसात वाजता ह.भ.प.व्यंकटेश महाराज सोनवणे वेद आचार्य महाराज, यांचे प्रवचन साडेसात ते साडेआठ सद्गुरु नारायण महाराजांचे कार्य, जीवनदर्शन, चारधाम निर्मिती याची चित्रफीत दाखवून कार्याचे विश्लेषण करून, आलेल्या मान्यवरांचा सत्कार व मनोगत इत्यादी कार्यक्रम होतील.

## गणेशोत्सव म्हणजे भक्ती व शक्तीचे प्रतीक : नगराध्यक्ष अभय आव्हाड

### श्री विवेकानंद विद्यामंदिर मध्ये साकारली इकोफ्रेंडली गणरायाची विविध रूपे

### पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळेत ४१० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

गणेशोत्सव हा भक्तीचा व उत्साहाचा सण असला तरी त्याला पर्यावरण संवर्धनाची जोड देणे ही काळाची गरज आहे या उद्देशाने पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी मध्ये पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यालयातील ४१० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मातीपासून गणरायांची विविध रूपे साकारून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

समाजामध्ये जनजागृती व एकता निर्मितीसाठी लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सव सुरू केला हा उत्सव म्हणजे भक्ती व शक्तीचे प्रतीक आहे असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

गणेश उत्सवामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगाचा वापर दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत असून गणेश विसर्जनानंतर जलस्रोतांचे प्रदूषण होऊन त्याचा जलचरावर विपरीत परिणाम होतो ही बाब लक्षात घेऊन विद्यालयातील



विद्यार्थ्यांना शाडूची माती व नैसर्गिक साधनांचा वापर करून गणेश मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने स्वतःच्या कल्पकतेचा वापर करत विविध आकर्षक गणेश मूर्ती तयार केल्या. कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा उत्साह व आनंद चेहऱ्यावर दिसून येत होता.

कार्यशाळेसाठी उत्कृष्ट शिल्पकार प्रा.प्रल्हाद चितळे, आजिनाथ दराडे व दीपक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व पार्थ नगरीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे, विश्वस्त कुणाल आव्हाड, ज्ञानेश्वर गायके,अनुजा कुलकर्णी,संपत घारे व विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक शरद मेढे यांनी तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले. आभार दीपक राठोड यांनी मानले.

## पारनेर तालुक्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मॉक ड्रिल व रूट मार्च

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पारनेर पोलिसांनी व्यापक मॉक ड्रिल आणि रूट मार्चचे आयोजन केले. यावेळी दंगलविरोधी पथकांचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे आणि सुपा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर शहरातील बस स्थानक परिसरात ही कवायत यशस्वीपणे पार पडली.



या मॉक ड्रिलमध्ये दोन अधिकारी व सुमारे ५० पोलीस जवान सहभागी झाले होते. त्याचबरोबर अग्निशामक दल आणि रुग्णवाहिकाही या मोहिमेत सक्रिय सहभागी झाल्या होत्या. कवायतीची सुरुवात पारनेर पोलीस स्टेशनपासून झाली. तेथून पोलिसांनी व्यवस्थित फॉर्मेशनमध्ये आणि शिस्तबद्ध पद्धतीने रूट मार्च काढत पारनेर बस स्थानकापर्यंत कूच केले. यादरम्यान दंगलविरोधी पथकांनी विविध काल्पनिक परिस्थितींमध्ये कशाप्रकारे त्वरित आणि प्रभावी कारवाई करावी, याचे प्रात्यक्षिक सादर केले. गर्दी नियंत्रणापासून ते संभाव्य गोंधळाच्या परिस्थितीपर्यंत विविध प्रकारचे ड्रिल करण्यात आले.

पारनेर व आसपासच्या नागरिकांनीही या कवायतीचे मोठ्या संख्येने अवलोकन केले. पोलिसांच्या तयारीचे आणि शिस्तबद्ध कार्याचे नागरिकांनी भरभरून कौतुक केले. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात गर्दी जमते आणि विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम होतात. त्यामुळे काही अनुचित प्रसंग उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी आगाऊ तयारी सुरू केली आहे. या मॉक ड्रिलमुळे दंगलविरोधी पथके पूर्णपणे सज्ज झाली असून, कोणतीही गोंधळाची किंवा अनपेक्षित परिस्थिती उद्भवल्यास त्वरित व प्रभावी कारवाई करता येईल, अशी खात्री पोलिसांना वाटते.

यासंदर्भात सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी नागरिकांना आवाहन केले की, गणेशोत्सवात सर्वांनी शांतता राखून उत्सव साजरा करावा. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी सर्वांनी घ्यावी. पोलिसांची ही पूर्वतयारी गणेशोत्सव यशस्वी, सुरक्षित आणि शांततेत पार पडण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

## पारनेर तालुक्यात गणेशोत्सवावर दुष्काळाचे सावट; शेती नुकसान अन् महागाईने जनतेचे कंबरडे मोडले

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यात यंदाच्या गणेशोत्सवावर दुष्काळाचे सावट पसरले आहे. पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने शेतीमालाचे मोठे नुकसान झाले असून वाढत्या महागाईने सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. गणपती बाप्पाच्या आगमनाच्या आधीच शेतकरी आणि सामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत.

पारनेर हा कांदा उत्पादनासाठी प्रसिद्ध तालुका. मात्र यंदा पाऊस न पडल्याने शेतात कोरडेपणा पसरला आहे. विहिरींचा पाणीसाठा रसाळला आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. कांदा, मिरची, भाजीपाला आणि इतर पिकांची पेरणी किंवा वाढ प्रभावित झाली. काही भागांत पिके करपली किंवा अपेक्षित उत्पादन घेता आले नाही. शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. चाऱ्याची टंचाईही गंभीर झाली आहे. बैलपोळा सारख्या सणांतही याचा परिणाम दिसून आला. सजावटीच्या साहित्याच्या खरेदीत मोठी घट झाली.

पावसाअभावी शेतीमालाचे उत्पादन घटले तर दुसरीकडे बाजारपेठेत महागाईने जोर धरला आहे. भाजीपाला, धान्य, इंधन आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढल्याने घरातला बजेट बिघडला आहे. गणेशोत्सवात मूर्ती, सजावट, प्रसाद आणि उत्सवाच्या इतर खर्चांसाठी पैसा उभा करणे सामान्य कुटुंबांना कठीण होत आहे.



अनेक सार्वजनिक मंडळे आणि घरगुती उत्सव साधेपणाने साजरे करण्याचा विचार करत आहेत. पाऊस नाही, पीक नाही, भाव वाढले. बाप्पाला आणण्यासाठीही कर्जाचा आधार घ्यावा लागतो, अशी व्यथा शेतकरी आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे रोजगारही प्रभावित झाला आहे. शासनाकडून मदत आणि पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुरू असली तरी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. गणेशोत्सवात भक्तांनी बाप्पाला पावसाची प्रार्थना केली आहे. दुष्काळ आणि महागाईच्या या दुहेरी संकटाने पारनेर तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून उत्सवाच्या आनंदावरही सावट पसरले आहे.

## ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेमुळे सातवी शिष्यवृत्ती परीक्षेला मिळणार नवी दिशा : रा. ह. दरे

### ढोकेश्वर विद्यालयाचे ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत यश

**टाकळी ढोकेश्वर(समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षेची गोडी निर्माण व्हावी, शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी भक्कम व्हावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सरावाची संधी मिळावी या उद्देशाने संस्थेच्या वतीने इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'शिष्यवृत्तीपूर्व ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा' संस्थेने २२ वर्षांपूर्वी सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेला नवी दिशा मिळणार आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे साहेब यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयातील कु. वैभवी सुमित कटारिया हिने ३०० पैकी २८२ गुण मिळवून जिल्ह्यात नववा क्रमांक मिळवला तर कु. आराध्या अमित कडुसकर हिने ३०० पैकी २७४ गुण मिळवून जिल्ह्यात तेरावा क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्र, ट्रॉफी आणि शिष्यवृत्ती देऊन अहिल्यानगर येथे जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या ग्रंथालय हॉल मधे सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून रा. ह. दरे साहेब बोलत होते. या प्रसंगी जिल्ह्यातील सहावीच्या ५४ तर सातवीच्या ३७ विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप वाटप करण्यात आली. इयत्ता सहावीच्या गुणानुक्रमे प्रथम सतारा विद्यार्थ्यांना तर सातवीच्या गुणांनुक्रमे एकवीस विद्यार्थ्यांना १००० शिष्यवृत्ती देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे साहेब आपल्या मातोश्री श्रीम. भिवंराबाई हरिभाऊ दरे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ही शिष्यवृत्ती देतात. या प्रसंगी पाचवी, सहावी साठी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेसाठी तयार करण्यात आलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तक लेखनात सहभागी विद्यालयातील पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद या शिक्षकांचा सन्मान पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील, खजीनदार ड. दिपलक्ष्मी म्हसे



मॅडम,ज्येष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशी साहेब, विश्वस्त जयंत वाघ, रेसिडेन्सिअल प्राचार्य विजय जाधव, उपप्रचार्य दादासाहेब वांढेकर, ढोकेश्वर चे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, तज्ज्ञ शिक्षक, पुरस्कार प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

ढोकेश्वर विद्यालयाच्या कु. आराध्या कडुस्कर, कु. वैभवी कटारिया तसेच ज्ञानवर्धिनी पुस्तक लेखनात सहभागी शिक्षक यांचे विशेष अभिनंदन संस्थेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे साहेब, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी सर उर्फ आण्णा, गव्हार्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.